सर्वोत्कृष्ट संस्थेसाठी कॅनडा येथील कॉमनवेल्थ ऑफ लर्निंगच्या आंतरराष्ट्रीय गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, नाशिक 422 222
दूरध्वनी (0253) 2231714, 2231715, 2230227 फॅक्स (91) 0253-2231716

जावक क्रमांक – यचममुवि/परीक्षा-३/२०१७ दिनांक : १० ऑगस्ट, २०१७

# कृषि शिक्षणक्रमाच्या पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांना परीक्षा अर्ज भरण्याबाबत महत्वाची सूचना

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या कृषि शिक्षणक्रमांतर्गत प्रमाणपत्र, पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी शिक्षणक्रमाकरीता प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना **फेब्रुवारी/मार्च २०१८** मध्ये होणाऱ्या अंतिम प्रात्यक्षिक व लेखी परीक्षेसाठी **पुनर्परीक्षार्थी (Repeater)** म्हणून परीक्षा अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याची मुदत दिनांक १५ ते ३० जुलै, २०१७ अशी माहितीपुस्तिकेत दर्शविण्यात आली होती.

ऑनलाईन पुनर्परीक्षार्थी अर्ज भरण्यासाठी काही तांत्रिक बाबींमुळे लिंक उपलब्ध करता आली नसल्यामुळे सदरची लिंक दिनांक १८ ते ३१ जुलै, २०१७ पर्यंत होती.

सदरची अंतिम मुदत वाढविण्यात आली असून ती आता **दिनांक ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी रात्री १२.०० वाजेपर्यंत सुरू राहील.** विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पद्धतीनेच पुनर्परीक्षार्थी अर्ज भरावयाचे आहेत. कोणत्याही परिस्थितीत ऑनलाईन पद्धतीने न भरलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत तसेच अर्ज स्विकारण्याची अंतिम मुदत यानंतर वाढविण्यात येणार नाही याची सर्व विद्यार्थी, संबंधित अभ्यासकेंद्रे व विद्यापीठाच्या विभागीय केंद्रांनी नोंद घ्यावी.

पुनर्परीक्षार्थीकरीता एक किंवा सर्व विषयांकरीता परीक्षा अर्जाचे शुल्क रू. ५००/- असून ते ऑनलाईन भरावयाचे आहे. पुनर्परीक्षार्थी अर्ज भरण्यासाठी Website : http://ycmou.digitaluniversity.ac ला जाऊन Online Exam From Submission for Repeater Student (पुनर्परीक्षार्थी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा सादर करण्यासाठी) क्लिक करावे. त्यानंतर विद्यार्थ्याने आपला १६ अंकी PRN नोंदवून अर्ज भरावा.

**परीक्षा नियंत्रक**